## प्रसिध्दीपत्रक

## बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट)ला १ जून,२०१२ पासून लागू होणारा वीज दर

आयोगाने बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) ला लागू असलेल्या वीज दरात यापूर्वी १ सप्टेंबर, २०१० सुधारणा केली होती. बेस्टची आर्थिक वर्ष २०११-१२ करिता वार्षिक महसूली गरज (एआरआर) आणि वीज दरास मान्यतेसाठीची याचिका आयोगाने १५ फेब्रुवारी २०१२ रोजी दाखल करुन घेतली.

२) आयोगाने सर्व ग्राहक आणि हितसंबंधितांकडून सूचना मागविल्या आणि २६ मार्च, २०१२ रोजी जाहीर सुनावणी आयोजित केली. या प्रक्रियेत ग्राहक प्रतिनिधींनी देखील भाग घेतला होता. जाहीर सुनावणी दरम्यान दाखल करण्यात आलेली अभिवेदने आणि म्हणणे तसेच उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांचा अभ्यास करुन आयोगाने बेस्टकरिता आर्थिक वर्ष २०११-१२ साठी १६ मे २०१२ च्या आदेशाने एआरआर आणि वीज दर निश्चित केले. सुधारित वीज दर १ जून, २०१२ पासून अंमलात येतील.

३) आयोगाच्या आदेशाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत:-

ए) बेस्टने त्यांच्या याचिकेत आर्थिक वर्ष २०११-१२ करिता एआरआर रु. ४५३७ कोटी अंदाजित केली असली तरी आयोगाने त्यापैकी रु. ३६८५ कोटी ची एआरआर, मुख्यत्वे करुन खालील कारणांसाठी, मंजूर केली आहे:-

एक) वेतन कराराची अद्याप अंमलबजावणी करावयाची असल्यामुळे त्यात करण्यात येणाऱ्या वाढीचा परिणाम आयोगाने या टप्प्यावर विचारात घेतलेला नाही.

दोन) यापूर्वी वसूल न केलेल्या खर्चावरील अनुषंगिक खर्चामधील कपात विचारात घेण्यात आली.

तीन) आर्थिक वर्ष २०११-१२ पर्यंतची एकत्रित महसूलाची तूट निश्चित करण्यासाठी, आयोगाने १६ मार्च, २०१२ च्या आदेशाने मान्यता दिलेल्या रकमा आर्थिक वर्ष २०११-१२ च्या एआरआर मध्ये धरण्यात आल्या असल्यामुळे, आर्थिक वर्ष २००९-१० च्या अचूक समायोजन आणि आर्थिक वर्ष २०१०-११ च्या तात्पूरत्या समायोजनानंतर महसूलातील तूटीचा फरक मंजूर करण्यात आला.

बी) बेस्टच्या वीज पूरवठा विभागाच्या ग्राहकांकडून, आर्थिक वर्ष २०११-१२ मधील रु.३२४ कोटी चा परिवहन विभागाचा तोटा वसूल करण्यास संबंधी मा.सर्वोच्च न्यायालयाने

८ फेब्रुवारी २०११ रोजी आदेश दिले आहेत की, **"आमच्या मते, अधिनियमाच्या कलम ५१ च्या तिसऱ्या परंतुकानुसार, वितरण परवानाधारकाने त्याच्या प्रत्येक व्यवसायाकरिता केवळ स्वतंत्र लेखी ठेवावयाचे नाहीत तर त्याने वीज पूरवठा व्यवसाय हा उपक्रमाच्या अन्य व्यवसायांना सबसिडी देत नाही याची खात्री करणे, असे ग्राहय धरणे बरोबर होणार नाही " (मराठीतील भाषांतर)**

सी) अशारीतीने मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, विद्युत अधिनियम, २००३ अंमलात येण्यापूर्वीपासून बेस्ट ही वीज वितरणाच्या व्यवसायात स्थानिक प्राधिकरण असल्यामुळे त्यांचा विद्युत पुरवठा विभाग परिवहन विभागाला सबसिडी देऊ शकेल.

डी) आयोगाने भागभांडवलावरील परतावा आणि अंतर्गत निधीवरील परताव्याकरिता बेस्टला शिल्लक रक्कम मंजूर केली आहे, जी बेस्टच्या वीज वितरण विभागाच्या मान्यता दिलेल्या खर्चाव्यतिरिक्त आहे आणि बेस्ट उपक्रम या शिल्लक रक्कमेचा वापर परिवहन विभागाचा काही तोटा भरुन काढण्यासाठी स्वेच्छानिर्णयानुसार करु शकेल. त्यामुळे, बेस्टने आर्थिक वर्ष २०११-१२ करिता परिवहन विभागाच्या दाखविलेल्या अंदाजित तोटयामधून आयोगाने, भागभांडवलावरील परतावा आणि अंतर्गत निधीवरील परताव्यासाठी आर्थिक वर्ष २०११-१२ करिता मंजूर केलेली रक्कम वजा करुन उरलेला रु. २१६ कोटी तोटा विचारात घेतला.

ई) बेस्टने सध्याच्या वीज दरानुसार आर्थिक वर्ष २०११-१२ पर्यंतच्या रु. २१८२.६२ कोटीच्या एकत्रित महसूली तूटीचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावानुसार रु.९७९.७१ कोटीची वसूली स्थगित ठेवून तिचे रुपांतर नियामक मत्तेत करावयाचे असून त्याची वसुली तीन वर्षांच्या कालावधीत करता येईल. बेस्टने प्रस्तावित केलेल्या वीज दरामध्ये सुमारे सरासरी ५१ टक्क्याची वाढ सुचविली आहे.

एफ) आयोगाने सध्याच्या वीज दराने आर्थिक वर्ष २०११-१२ पर्यंत रु.१०६१ कोटीच्या एकत्रित महसूली तूटीला मंजूरी दिली आहे, ज्यामध्ये मुख्यत्वे करुन परिवहन विभागाच्या आर्थिक वर्ष २००९-१०, आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ च्या रु.६५९ कोटीच्या तोटयाचा समावेश आहे.

जी) बेस्टने सादर केलेल्या म्हणण्याच्या आधारे, असे दिसून येते की आर्थिक वर्ष २००४-०५ ते आर्थिक वर्ष २००८-०९ या कालावधीमधील परिवहन विभागाचा

एकत्रित तोटा, रु.१७०० कोटीपर्यंत जाण्याची शक्यता आहे. बेस्टकरिता मंजूर केलेल्या भागभांडवलावरील परतावा आणि अंतर्गत निधीवरील परताव्याच्या रकमांचे समायोजन केल्यानंतर देखील बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागाच्या वीज दरामधून वसूल करावयाचा परिवहन विभागाच्या तोटयाची रक्कम, या रक्कमेमधील अनुषांगिक खर्चाच्या व्यतिरिक्त, असल्यास, रु.१२०० कोटीपर्यंत जाईल. त्यामुळे, आयोगाचे असे मत आहे की, परिवहन विभागाच्या तोटयाची वसूली पुढे ढकलणे उचित होणार नाही आणि म्हणून आयोगाने वितरण विभागाच्या आर्थिक वर्ष २००९-१०, आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ च्या रु. ६५९ कोटीच्या महसूली तूटीची वसूली करण्यास मान्यता दिली. ही वसूली आर्थिक वर्ष २०११-१२ च्या महसूली तूटीचा भाग म्हणून,१ जून, २०१२ पासून लागू होणाऱ्या सुधारित वीज दरातून करण्यात येईल.

एच) वरील महसूली तूट भरुन काढण्यासाठी वीज दरात करावी लागणारी सरासरी वाढ ३९ टक्के आहे. या वाढीमुळे जरी धक्का बसणार असला तरी ती बेस्टने मागितलेल्या सरासरी ५१ टक्के वाढीपेक्षा कमी आहे. त्यामुळे आयोगाने महसूली तूटीमधून रु.३०० कोटीची नियामक मत्ता निर्माण करुन तिची वसूली पुढील ३ वर्षात अनुषांगिक खर्चासह करण्याचे ठरविले.

आय) आयोगाने वीज दरात सरासरी वाढ २७.६टक्के मंजूर केली आहे आणि वीज पुरवठयाचा आयोगाने मान्यता दिलेला सरासरी खर्च रु.७.७८ प्रति युनिट आहे.

जे) आर्थिक वर्ष २०११-१२ संपले असल्यामुळे आर्थिक वर्ष २०११-१२ पर्यंतच्या एकत्रित महसूली तूटीची वसूली आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये लागू करावयाच्या सुधारित वीज दरामधून करण्यास मंजूरी दिली आहे. कारण यापुढील वीज दराचा आदेश आर्थिक वर्ष २०१२-१३ मध्ये निर्गमित करण्याची शक्यता आहे.

के) या आदेशामध्ये आयोगाने सर्वसाधारण वीज दरात वाढ केली आहे आणि त्याच वेळेस आयोगाने यापूर्वीच्या १२ सप्टेंबर २०१० रोजीच्या आदेशात मंजूर केलेल्या पातळीपेक्षा क्रॉस सबसिडी कमी केली आहे.

एल) सुधारित वीज दरामुळे महसूलात रु. ७६१ कोटीची एकूण अतिरिक्त वाढ होण्याची अपेक्षा आहे आणि त्यामधून आर्थिक वर्ष २००९-१०, आर्थिक वर्ष २०१०-११ आणि आर्थिक वर्ष २०११-१२ मधील परिवहन विभागाच्या तोटयाची रु. ६५९ कोटीची रक्कम ही एकूण वीज दरातील वाढीच्या ८७ टक्के इतकी आहे. त्यामुळे बेस्टच्या ग्राहकांना परिवहन विभागाच्या तोटयाची वसूली वीज पुरवठा विभागाच्या वीज दरामधून करण्याच्या परिणामासंबंधी जागृती व्हावी याकरिता आयोगाने, "परिवहन विभाग तोटा वसूली आकार" नावाचा एक नवीन आकार निर्माण केला

आहे आणि हा आकार संबंधित वर्गवारीच्या / वीज वापराच्या टप्प्याच्या ऊर्जा आकारांच्या प्रमाणात लागू केला आहे.

एम) मा. विद्युत अपील न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालानुसार, आयोगाने, रुग्णालये आणि शैक्षणिक संस्था, त्यांची मालकी कोणाचीही असली तरी, आणि धार्मिक आणि धर्मादायी संस्था यांच्याकरिता दोन नवीन ग्राहक वर्गवारी (लघु दाब - नऊ आणि उच्च दाब-पाच) निर्माण केल्या आहेत.

एन) आयोगाने, लघु दाब दोन (ए) आणि लघु दाब तीन वर्गवारीमध्ये वीज वापराच्या टप्प्यांची संख्या कमी करुन ती २ पर्यंत ठेवण्यात आली आहे.ती खालीलप्रमाणे :

- ० ते ५०० युनिट्स
- ५०० युनिट्सच्या वर

ओ) आयोगाने, स्थिर/मागणी आकारांच्या माध्यमातून, बेस्टच्या स्थिर खर्चाच्या वसुलीचे विश्लेषण केले आहे. वीज खरेदीच्या अस्थिर खर्चाव्यतिरिक्त, वार्षिक महसुली गरजेचे सर्व भाग स्थिर स्वरुपाचे आहेत हे समजणे गरजेचे आहे. बेस्ट प्रकरणी, विद्यमान स्थिर/मागणी आकारांच्या माध्यमातून स्थिर खर्चाची वसुली खूप कमी प्रमाणात, १२ % च्या आसपास, इतकी होते, जी सामान्यपणे ३०-४० % च्या आसपास असावयास हवी. जेणेकरुन परवानाधारकाला, वीज वापर कितीही असला तरी, महसुलाच्या स्थैर्याची खात्री राहील आणि ग्राहक देखील विजेच्या खर्चासाठी खर्चाच्या स्वरुपाच्या किंमत अदा करील. तथापि, स्थिर/मागणी आकारांमध्ये मोठी वाढ करणे उचित नाही, त्यामुळे, आयोगाने सर्व वर्गवारींसाठी स्थिर/मागणी आकारांमध्ये हळूहळू वाढ करण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे स्थिर आकाराच्या माध्यमातून स्थिर खर्चाची वसुलीमध्ये १५.७ % पर्यंत वाढ झाली आहे.

पी) सूट/प्रोत्साहन-अधिदान देणे - न देणे पूर्वीप्रमाणेच ठेवण्यात आली आहेत.

क्यु) आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर बेस्टच्या वार्षिक महसुली गरज आणि वीज दर याचिकेवरील आयोगाचा सविस्तर आदेश उतरवून घेण्याजोग्या रुपात उपलब्ध आहे.